# तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद
## शासकीय तंत्रनिकेतनच्या बाजुला, उस्मानपुरा
## पत्र पेटी क्र -५१६ औरंगाबाद - ४३१ ००५
(०२४०)२३३४२१६(P) २३३४७६९(O) Fax-२३५६८२०
http://www.dteau.org email : roaurangabad@dtemaharashtra.gov.in

**कार्यालयीन आदेश :**

जा.क्र.विकाऔ/**आस्था-३**/बदल्या/२०१९/9623

दिनांक 3 1 MAY 2019

**संदर्भ :-** १) उच्च व तंत्रशिक्षण आणि सेवायोजन विभाग शासन निर्णय क्र. जीईसी/३३९७/७३७६/ताशिं-१, दि. १०-०४-१९९७
२) महाराष्ट्र शासकीय कर्मचा-यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्य पार पाडतांना होणा-या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५
३) उच्च व तंत्रशिक्षण विभाग शा.नि.क्र.संकिर्ण-२०१५/(०१/१५) मशि-१, दि.२५-५-२०१५
४) सामान्य प्रशासन विभाग शा. नि. क्र. एसआरव्ही-२०१७/प्र.क्र.४१५/कार्यासन १२ दि.०९-०४-२०१८
५) नागरी सेवा मंडळाची बैठक दिनांक २८-०५-२०१९

महाराष्ट्र शासकीय कर्मचा-यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडतांना होणा-या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ मधील (सन २००६ महा. २१ ) च्या कलम ७ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन, दिनांक २८-५-२०१५ च्या अधिसुचनेद्वारे उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील गट-ड साठी बदली करणारे सक्षम प्राधिकरण म्हणून विभागीय सहसंचालकांना पदनिर्देशित करण्यात आलेले आहे.

त्यास अनुसरुन वरील संदर्भ क्र-३ च्या शासन निर्णयान्वये गठित नागरी सेवा मंडळ यांच्या शिफारशीनंतर सहसंचालक , तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद यांना उपरोक्त संदर्भिय शासन निर्णयान्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन या कार्यालयाच्या अधिनस्त संस्था/कार्यालयातील गट-ड संवर्गातील खालील कर्मचा-यांच्या त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या ठिकाणी विनंती/प्रशासकीय कारणास्तव विभागांतर्गत बदल्या करण्यात येत आहेत.

| अ. क्र. | कर्मचा-यांचे नाव, पदनाम व सद्याचे कार्यरत ठिकाण | बदली/पदस्थापनेनंतरचे ठिकाण | बदलीचे स्वरुप |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| | **शिपाई** | | |
| १ | श्री.डी.एस.सोनवणे, शिपाई, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद | शासकीय तंत्रनिकेतन, औरंगाबाद येथे श्री.एम.आर.घटे यांच्या सेवानिवृत्तीने रिक्त झालेल्या **शिपाई** या पदावर | विनंती बदली |
| २ | श्री.एम.एम.सुर्यवंशी, शिपाई, शासकीय तंत्रनिकेतन, औरंगाबाद | तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद येथे श्री.डी.एस.सोनवणे यांच्या विनंती बदलीने रिक्त होण्या-या शिपाई या पदावर | प्रशासकीय बदली |
| ३ | श्री.व्ही.एस.साळवे, शिपाई, शासकीय तंत्रनिकेतन, अंबड | शासकीय तंत्रनिकेतन, जालना येथे रिक्त असलेल्या **शिपाई** या पदावर | विनंती बदली |
| | **हमाल** | | |
| ४ | श्री.बी.एस.परदेशी, हमाल, शासकीय निवासी महिला तंत्रनिकेतन, लातूर | शासकीय तंत्रनिकेतन, बीड येथे रिक्त असलेल्या **हमाल** या पदावर | विनंती बदली |

| १ | २ | ३ | ४ |
|---|---|---|---|
| ५ | श्री.एस.एच.अवधूत, हमाल, शासकीय तंत्रनिकेतन, जालना | शासकीय निवासी महिला तंत्रनिकेतन, लातूर येथे श्री.बी.एस.परदेशी यांच्या विनंती बदलीने रिक्त होणा-या **हमाल** या पदावर | विनंती बदली |
| ६ | श्री.डी.जी.झंपलवाड, हमाल शासकीय तंत्रनिकेतन, नांदेड | शासकीय तंत्रनिकेतन, जिंतूर येथे रिक्त असलेल्या **हमाल** या पदावर | प्रशासकीय बदली |
| | **सफाईगार** | | |
| ६ | श्री.एस.पी.चिंडाले, सफाईगार पु.ला.शासकीय तंत्रनिकेतन, लातूर | शासकीय निवासी महिला तंत्रनिकेतन, लातूर येथे रिक्त असलेल्या **सफाईगार** या पदावर | प्रशासकीय बदली |
| ७ | श्री. ए.आर.चिंडालिया, सफाईगार,शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, औरंगाबाद | शासकीय तंत्रनिकेतन, औरंगाबाद येथे रिक्त असलेल्या **सफाईगार** या पदावर | प्रशासकीय बदली |

सदर बदल्यांची अंमलबजावणी प्रभावीपणे होणे गरजेचे असल्यामुळे बदली झालेल्या सर्व कर्मचा-यांचे कार्यमुक्ततेच्या दिनांकापर्यंतचे अथवा जास्तीत जास्त दि. ३०-०६-२०१९ पर्यंतचे वेतन ते सध्या कार्यरत असलेल्या संस्थेच्या आस्थापनेवर काढावे. त्यांनतरचे वेतन कोणत्याही परिस्थितीत बदलीपुर्वीच्या संस्थकेडून/आस्थापनेकडून काढण्यात येऊ नये. सदर वेतन संबधित कर्मचारी बदलीच्या संस्थेत रुजू झाल्यानंतर बदलीनतरंच्या संस्थेने/आस्थापनेने काढावे. दि.०१-०७-२०१९ पासूनचे वेतन बदलीपुर्वी कार्यरत असलेल्या संस्थेतील/आस्थापनेतील आहरण व संवितरण अधिका-याने अदा केल्यास त्यांना व्यक्तीशः जबाबदार धरण्यात येईल.

उपरोक्त कर्मचा-यांनी बदली करण्यात आलेल्या संस्थेत/कार्यालयात तात्काळ रुजू व्हावे. ज्या कर्मचा-यांची बदली त्यांच्या विनंतीवरुन करण्यात आलेली आहे किंवा ज्यांचे मुख्यालयात बदल होत नाहीत अशा कर्मचा-यांना बदलीच्या ठिकाणी हजर होण्यासाठी प्रवासखर्च व पदग्रहण अवधी अनुज्ञेय राहणार नाही. तसेच ज्या कर्मचा-यांची बदली प्रशासकीय कारणास्तव करण्यात आलेली आहे त्यांना बदलीच्या ठिकाणी हजर होण्यासाठी नियमानुसार प्रवासखर्च व पदग्रहण अवधी अनुज्ञेय राहील.

**(महेश शिवणकर)**
**प्र.सहसंचालक,**
**तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,औरंगाबाद**

**प्रत, माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित**

१. वरिष्ठ कोषागार अधिकारी, जिल्हा कोषागार कार्यालय, औरंगाबाद
२. कोषागार अधिकारी, जिल्हा कोषागार कार्यालय, जालना/नांदेड/बीड/लातूर
३. उपकोषागार अधिकारी, उपकोषागार कार्यालय, जिंतूर/अंबड
४. प्राचार्य, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, औरंगाबाद यांना माहितीस्तव.
५. प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन, औरंगाबाद/जालना/जिंतूर/नांदेड/बीड/पु.ला.लातूर/निवासी महिला तंत्रनिकेतन,लातुर
६. संबधित संस्थाप्रमुखांना कळविण्यात येते की, बदली झालेल्या कर्मचा-यांना तात्काळ कार्यमुक्त करण्यात यावे व बदली झालेल्या संस्थेत कर्मचा-यांना बदलीच्या ठिकाणी रुजु करुन घेण्यात यावे तसेच बदली करण्यात आलेल्या संबंधित कर्मचा-यांची ईएमआयएस या प्रणालीमध्ये नोंद घेण्यात यावी.
७. संबधित कर्मचारी (संस्था/कार्यालय प्रमुखामार्फत)